N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** संत तुकारामनगर
**Year (वर्ष):** 2025
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0557
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/11/2025 02:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Date From (दिनांक पासून):** 29/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/11/2025
**Time Period (कालावधी):**
**Time From (वेळेपासून):** 08:56 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/11/2025 **Time (वेळ):** 01:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/11/2025 01:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** केएसबी चौक पिंपरी पुणे फूटपाथव,म्हसोबा खरवडे प्रसन्न मंदिराच, शेजारील चहाच्या टपरीजवळ
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आसावरी जगन्नाथ शेडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8425808058

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वर्षा विठठल कांबळे | | | 1. पिंपरी वाहतुक विभाग,रुम नं 04,परिवर्तन सोसायटी, बौध्दनगर,पिंपरी ,पुणे,वर्ग - 3, संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री कष्णा मच्छिंद्र गव्हाणे | | | 1. ट्रफिक वर्डन पिंपरी वाहतुक, वडगाव रोड राम मंदिरासमोर, राम अपार्टमेंट,रुम नं 3,,दुसरा |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | मजला आळंदी ,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 400/- रूपये स्विकारली. | 400.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

400.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

गु र नं -557/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलम 7,7अ,12
दि.29/11/2025
फिर्यादी जबाब

मी आसावरी जगन्नाथ शेडगे वय- 35 वर्षे, व्यवसाय – नोकरी,पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे रा.ठी.मालवाडी रोड,कळस, पुणे- मो. 8425808058
आज रोजी समक्ष हजर राहून फिर्याद देते की, आम्ही दि.26/11/2025 रोजी 18.20 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात,हजर असताना पोलीस उप अधीक्षक श्री दयानंद गावडे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री.भारत विजय बिवाल,वय- 33 वर्षे,व्यवसाय -रिक्षा चालक, रा.सव्र्हे नं 24, सम्राट नगर,लेन मार्क डॉ.राजेंद्र प्रसाद,बोपोडी यांची ओळख करुन दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत तक्रार असून ती घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशित केले व सदर कारवाईकामी पोशि/95 दिवेकर, मपोशि 7934/ वैशाली माकर,चालक सहाफौ/चव्हाण, व त्यांचेकडील शासकीय वाहन एम एच 12 युसी 4109 असे पथक मदतीकरता दिले. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे गोपणीय कामानिमित्त हजर असलेले पंचायत समिती हवेली कार्यालयाचे पंच साक्षीदार नामे श्री. मोहन शामराव शेळकंदे वय 42 वर्षे पद-कनिष्ठ सहायक लिपीक,पंचायत समिती हवेली, पुणे रा. सं.न 272 साठे नगर,शिंदे कॉम्पेलक्स जवळ, लोहगाव,पुणे व श्री.योहान मोझेस काळे वय 53 वर्षे पद –परिचर पंचायत समिती, पंचायत समिती हवेली, पुणे, पुणे रा. फलॅट नं 308,च-होली बुद्रुक पुणे,हे तुमच्याकडे थोडयाच वेळात येतील असे आम्हास सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री भारत बिवाल व सापळा पथक यांचेसह आमचे कक्षात आलो.त्यानंतर आम्ही तक्रारदार व सापळा पथकाची ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव भारत विजय बिवाल वय 33 वर्षे व्यवसाय -रिक्षा चालक रा.सव्र्हे नं24,सम्राट नगर,लेन मार्क डॉ.राजेंद्र प्रसाद,बोपोडी असे सांगितले.त्यानंतर सुमारे 18.45 वाजता वरिल नमूद दोन्ही पंच साक्षीदार आमचे कक्षात हजर झाले. आम्ही सर्वांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली. त्यांनतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार श्री. भारत विजय बिवाल यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी होत असलेबाबत तक्रार असून त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करण्यास तयार आहात का?अशी विचारणा करता दोन्ही पंचांनी त्यास संमत्ती दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांची तक्रार प्रथम तोंडी ऐकून घेतली. त्यावरून तक्रारदार, पंच साक्षीदार यांना अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून करण्यात येणा-या पुढील पडताळणी व सापळा कार्यवाही बाबतची सविस्तर माहिती दिली. तसेच सदर कार्यवाही कामी पंच क्रं 1 म्हणुन श्री. मोहन शामराव शेळकंदे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. योहान मोझेस काळे हे काम पाहतील असे सर्वोनुमते



Scanned with CamScanner

ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना लिहिता व वाचता येत नसल्याने सापळा पथकातील पोशि रवी दिवेकर यांनी तक्रारदार सांगतील त्याप्रमाणे तक्रार संगणकावर टंकलिखित केली.ती पुढील प्रमाणे- तक्रारदार यांनी सन 2019 साली त्यांचे नावाने रिक्षाचे परमिट काढले असुन त्याचा बॅच क्रं.001039619 असा आहे.तक्रारदार यांनी सन 2019 मध्ये अँटोरिक्षा क्रं MH 12 RP 8847 हि खरेदी केली आहे.जून 2025 पासून तक्रारदार मोरवाडी चौक केएसबी चौक कुदळवाडी या रुट दरम्याण रिक्षा चालवून कुंटूबाचा उदरनिर्वाह करतात.

दिनांक 17/11/25 रोजी तक्रारदार त्यांच्या रिक्षातुन फ्रंट सिट ला 2 प्रवासी व पाठीमागे 3प्रवासी असे एकूण 5 प्रवासी घेवून मोरवाडी चौकातुन केएसबी चौकाकडे जात असताना केएसबी चौकात ट्रफिक पोलीस शिपाई वर्षा कांबळे यांनी तक्रारदारांची रिक्षा थांबवली व त्यांना रिक्षातुन उतारण्यास सांगुन बाजुला येण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार रिक्षातुन उतरुन बाजूला गेले असता पोशि वर्षा कांबळे या तक्रारदाराला रिक्षातुन येवढे प्रवासी वाहतुक कशाला करता असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना सॉरी मॅडम चूक झाली, परत असे करणार नाही! असे म्हणाले. तेव्हा पोशि वर्षा कांबळे या तक्रारदाराला,तूला दंड भरावा लागेल अशा म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार हे त्यांना किती दंड भरावा लागेल असे म्हणाले असता पोशि वर्षा कांबळे यांनी तक्रारदारांना त्यांचे सोबत असणारे ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांच्याकडे जावून बोलण्यास सांगितले तेव्हा वॉर्डन गव्हाणे यांच्याकडे तक्रारदार गेले असता वॉर्डन गव्हाने यांनी तक्रारदारांना 300 रुपये दे तुला दंड करीत नाही असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदारांनी दंडाच्या भीतीने ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांना 300 रुपये दिले व तेथुन निघुन गेले.त्यानंतर दि.26/11/2025 रोजी सकाळी 12-30 वाजण्याच्या सूमारास तक्रारदार केएसबी चौकात पॅसेंजर सोडून मोरवाडी चौकाकडे निघाले असताना ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांनी तक्रारदारांची रिक्षा थांबवली व तक्रारदारांना म्हणाले कि,""तू नेहमी यापरिसरात रिक्षाने जादा प्रवासी वाहतुक करीत असतो तुझ्या रिक्षावर जादा प्रवासी वाहतुक करीत असल्याबाबत कोणत्याही प्रकारे कारवाई करायची नसल्यास तु उदया पासून महिण्याला हफ़्ता म्हणून 500 रुपये माझ्याकडे आणून देत जा मी वर्षा कांबळे मॅडमला सांगतो"",असे म्हणाले.तेव्हा तक्रारदार कारवाईच्या भीतीने टफिक वॉर्डन गव्हाणे यांना हो म्हणाले व त्याठिकाणाहून निघुन आले.तक्रारदार यांना लिहिता व वाचता येत नसल्याने आमच्या आदेशाने पोशि दिवेकर यांनी संगणकावर तक्रारदारांची सविस्तर तक्रार टंकलिखित करुन त्याची प्रिन्टं काढुन तक्रारदार यांना पंच क्रं 2 काळे यांनी तक्रारदारांना वाचून दाखविल्यानंतर तक्रारदार ,आम्ही व पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी लोकसेविका पोलीस शिपाई वर्षा कांबळे व ट्रॉफिक वार्डन गव्हाणे यांनी त्यांना दि.27/11/25 रोजी भेटण्यास बोलविले असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही सापळा पथकास व दोन्ही पंच साक्षीदार यांना दि.27/11/2025 रोजी सकाळी 09.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या व तक्रारदार भारत बिवाल हे निगडी भोसरी रोड यशवत नगर येथे थांबणार असल्याचे सांगितले.

त्याप्रमाणे दि.27/11/2025 रोजी 09.00 वाजता आम्ही,दोन्ही पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे हजर होवून आम्ही सर्वजण सहा.फौ चव्हाण यांचे ताब्यातील शासकीय वाहन MH 12 UC 4109 याने सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य घेवून अँन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालय येथून 09.54 वा.रवाना झालो. साधु वासवाणी चौक - आरटीओ चौक - वाकडेवाडी - खडकीमार्गे येथील यंशवत नगर निगडी भोसरी रोड येथील यंशवतं नगर जवळ सिध्दार्थ अँटोमोटो इंडिया येथील सार्वजनीक रोडवर 10.34 वा. चे सुमारास पोहोचलो. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही पोहचलो असल्याचे कळविले असता थोडयाच वेळात 10.47 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार भिवल हे त्यांचेकडील तीनचाकी वाहन रिक्षा क्रं MH 12 RP 8847 यावरुन सदर ठिकाणी आले.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना शाशकिय वाहनात बसण्याची सुचना देवून सापळा पथक, तक्रारदार व पंच साक्षीदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पंचाना शासकीय व्हॉईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये दोन्ही पंचासमक्ष नवीन दोन सॅनडिस्क कंपनीची 64 GB क्षमतेची मेमरीकार्ड घातली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि रवी दिवेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री. भारत बिवाल त्यानंतर पंच क्र.1 श्री शेळकंदे व पंच क्र.2 श्री. काळे यांची पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 11.20 वा.ची होती. तसेच आम्ही सदर ध्वनिमुद्रीत केलेल्या निवेदनाचे व्हिडीओ चित्रिकरण केलेले आहे.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालु करुन पोशि रवी दिवेकर यांचे मदतीने तक्रारदार यांनी परिधान केलेल्या टिशर्टच्या आतील बाजुस सेफ्टी पिनचे सहाय्याने लावला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 शेळकंदे यांचेसह तक्रारदार यांची रिक्षा क्रं MH 12 RP 8847 याने केएसबी चौक लोकसेवक पोलीस शिपाई वर्षा कांबळे व ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांची भेट घेण्याकरता 11.34 वाजता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 शेळकंदे हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी पोशि/95 दिवेकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद



Scanned with CamScanner

केला.ती वेळ 11.53.वा.ची होती.त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 शेळकंदे हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले असता आम्ही तक्रारदार व पंच क्रं 1 शेळकंदे यांना शाशकिय वाहनात बसवून पंच क्रं 1 शेळकंदे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविले पासून परत येईपर्यंतची हकिकत विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे तक्रारदाराच्या रिक्षाने के.एस.बी चौकात गेलो असता त्या ठिकाणी लोकसेविका मपोशि वर्षा कांबळे व ट्रफिक वार्डन गव्हाणे हे उपस्थित नव्हते त्यानंतर तक्रारदारांनी आजुबाजुला पाहिले असता दोघे जण त्यांना दिसुन आले नाही. त्यानंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या रिक्षाने आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो. अशी हकिकत पंच क्रं 2 काळे यांचेसमक्ष सांगीतली.त्यानंतर पोनि शेडगे यांनी तक्रारदार यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत हकिकत विचारली असता,तक्रारदार यांनी पंच क्रं 1 शेळकंदे यांनी सांगितल्या प्रमाणेच हकिकत पंच क्रं 2 काळे यांचेसमक्ष सांगीतली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष पडताळणी कारवाई दरम्यानचे व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता,त्यामध्ये काहीएक संभाषण झाले नसल्याचे मिळुन आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी ट्रफिक वार्डन गव्हाणे यांनी दि. 26/11/2025 रोजी त्यांचा संपर्क क्रंमाक दिला असुन आपण त्यावर संपर्क करुण ते कोठे असुन कोठे भेटायचे या बाबात विचारणा करतो असे सांगितले.त्यावेळी तक्रारदार यांनी वॉर्डन गव्हाणे यांना केलेला फोन कॉल व्हाईस रेकॉर्डर वर ध्वनिमुद्रीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर पोशि रवी दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु केला ती वेळ 12.01 अशी होती.तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 7798894403 वरुन ट्रफिक वार्डन गव्हाणे यांच्या मोबाईल क्रं 9730219269 यावर रेग्यूलर कॉल केला असता ट्रफिक वार्डन गव्हाणे यांचा फोन व्यस्त येत असल्याने तक्रारदार आणि ट्रफिक वार्डन गव्हाणे यांच्यामध्ये संभाषण होऊ शकले नाही.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर थोडयावेळाने 12.03वाजता पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक 7798894403 यावरुण ट्रफिक वार्डन गव्हाणे यांच्या 9730219269 यावर रेगयुलर कॉल केला असता ट्रफिक वार्डन गव्हाणे यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर तक्रारदार व आम्ही सापळा पथक वॉर्डन गव्हाणे यांच्या फोनची वाट पाहत शाशकिय वाहनात थांबुन राहिलो.त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या भावाची पत्नी मयत झाली असल्याचे सांगुन सदरठिकाणी जायचे असल्याने दि.27/11/25 रोजीची कारवाई स्थगित करण्याची विनंती करुन पुढील कारवाई दि.29/11/25रोजी करण्याची विनंती केल्याने दि.27/11/25 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.29/11/2025 रोजी दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक तसेच नव्याने मदतीकरीता दिलेले पोशि2845/आडके असे सकाळी 08.30 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे हजर झाले.त्यानंतर आम्ही 26/11/2025 रोजी झालेल्या कारवाईची थोडक्यात उजळणी घेतली.त्यानंतर आम्ही सापळा पथकास तक्रारदार हे यशवंत नगर भोसरी निगडी नगर येथे येणार असलेबाबत सांगितले.त्यानंतर आम्ही पडताळणी,सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन 08:56 वाजता शासकीय वाहन क्र.MH 12 UC 4109 ने रवाना होवून तक्रारदार यांना संपर्क करुन कार्यालयातुन निघालेबाबतची माहीती देवून, तक्रारदार श्री.भारत बिवाल यांना यशवंत नगर भोसरी निगडी नगर येथे येणेबाबत सांगितले. आम्ही सर्व सरकारी वाहनातुन साधु वासवाणी चौक - आरटीओ चौक - वाकडेवाडी - खडकीमार्गे येथील यंशवत नगर निगडी भोसरी रोड येथील यंशवतं नगर जवळ सिध्दार्थ अँटोमोटो इंडिया येथील सार्वजनीक रोडवर 09:32 वा. पोहोचलो.तेव्हा आम्ही तक्रारदार यांना यशवंतनगर येथे पोहचलो असल्याचे सांगितले.थोडयावेळाने सदरठिकाणी तक्रारदार भारत बिवाल हे त्यांचेकडील अँटोरिक्षा क्र.एमएच 12 आरपी 8847 सह हजर झाले. आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनामध्ये बसवुन पूढील कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या.त्यानंतर सदरठिकाणी लोकांची वर्दळ वाढल्याने कोणालाही संशय येवू नये याकरीता आम्ही सापळा पथक शासकिय वाहनासह तसेच तक्रारदार यांची रिक्षा घेवून यशवंत नगर कोक्लीन कंपनी समोर जावून थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र 1 श्री. शेळकंदे यांचेसह केएसबी चौक येथे पाठवुन लोकसेविका पोलीस शिपाई वर्षा कांबळे व ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांचेकडे लाचेची मागणी बाबत पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.तक्रारदार श्री.भारत बिवाल व पंच क्र.1 श्री.शेळकंदे व पंच क्र.02 श्री.काळे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 10.53 वा ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करुन तो पोशि रवी दिवेकर यांनी तक्रारदार श्री.भारत बिवाल यांनी परिधान केलेल्या टिशर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री.शेळकंदे यांचेसह 11.06 वा पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील अँटोरिक्षा क्र.MH 12 RP 8847 मधुन कोक्लीन कंपनी येथुन रवाना केले



Scanned with CamScanner

व आम्ही पथकासह सदर ठिकाणी शासकिय वाहनात थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री भारत बिवाल व पंच क्र.1 श्री शेळकंदे हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी ऑटो रिक्षाने परत आले.त्यांना शासकीय वाहनात बसवून त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर पोशि रवी दिवेकर यांचे मदतीने काढून बंद केला. ती वेळ 11.26 वाजताची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 यांना ते पडताळणी कार्यवाहीकरीता रवाना झालेपासून ते परत येईपर्यंतची हकिकत विचारली असता,त्यांनी पंच क्र.2 श्री काळे यांचे समक्ष सांगितले की, ते व तक्रारदार असे तक्रारदाराचे वाहनाने रवाना होवून केएसबी चौकात पोहचले असता सदरठिकाणी फूटपाथवरील श्री म्हसोबा खरावडे प्रसन्न मंदिराच्या शेजारी असणा-या चहाच्या टपरीजवळ ट्रफिक वॉर्डन गव्हाणे व मपोशि वर्षा कांबळे हे हजर असलेबाबत तक्रारदार यांनी मला डोळ्याने इशारा करुन सांगितला.तेव्हा मी चहाच्या टपरीजवळ चहा घेण्यास उभा राहिलो व तक्रारदार ट्रफिक वॉर्डन गव्हाणे व मपोशि वर्षा कांबळे यांचेसोबत बोलण्यास गेले तेव्हा ट्रफिक वॉर्डन गव्हाणे तक्रारदार यांना आणले का म्हणाले असता तक्रारदार हे ट्रफिक गव्हाणे यांना म्हणाले कि,मी काय म्हणतोय सर...आपलं ठरलं ते काय कमी नाय होणार का .....500 रुपये जे ठरलयं कमी नाही होणार का ?त्यावर ट्रफिक वॉर्डन गव्हाणे म्हणाले कि,तुम्हाला पुढे धरलं तरी मी आहे ना, हिथं धरलं तरी त्यावर तक्रारदार ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांना म्हणाले कि थोडं फार जरा धंदा पण हे एकदा म्हणा तेवथं मॅडमला रिक्वेस्ट करा थोड काय काही तरी करायला लावा जरा त्यावर वॉर्डन गव्हाणे तुम्ही सांगा चला जाऊ दया असे म्हणाले असता तक्रारदार हे तुम्ही 500 रुपये म्हटले म्हणलं त्यापेक्षा काहीतरी थोडं तरी कमी करा असे म्हणाले त्यावर गव्हाणे चारशे करा जावु दया असे म्हणाले असता तक्रारदार एकदा बोला की मग मॅडमशी असे म्हणाले असता गव्हाणे हा सांगितलं की असे म्हणाले असता त्यावर तक्रारदार मपोशि वर्षा कांबळे मॅडमला काव मॅडम असे म्हणाले असता मपोशि वर्षा कांबळे मॅडम यांनी तक्रारदारांना इशाराने वार्डन गव्हाणे यांचेशीच बोलण्यास सांगितले असता वॉर्डन गव्हाणे हे तक्रारदारांना मीच बगतो मलाचं फोन लावायचं असे म्हणाले असता तक्रारदार वॉर्डन गव्हाणे यांना मी आलो इथं मगं पैशे घेवुन भाडं सोडलंना ...बाटल्या त्याकडुन पैसे घेवुन येतो मग...हा असे मपोशि वर्षा कांबळे यांचे समक्ष म्हणाले व तेथुन निघून तक्रारदार रिक्षात बसले असता मी हि तक्रारदार यांच्या रिक्षात बसुन आपण थांबलेल्या ठिकाणी आलो अशी हकिकत पंच क्र.1 शेळकंदे यांनी सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री भारत बिवाल यांना घडलेली हकिकत विचारली असता त्यांनी देखील पंच क्र.1 यांच्याप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण लॅपटॉपवर कॉपी करुन फास्ट फॉरवर्ड करुन पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेल्या हकिकतीप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.एकंदरीत आज दि.29/11/2025 रोजी झालेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये ट्रफिक वॉर्डन गव्हाणे यांनी मपोशि वर्षा कांबळे यांचेसमक्ष स्वत करीता व मपोशि वर्षा कांबळे यांचेकरीता तक्रारदारांकडे,तक्रारदार त्यांच्या रिक्षातून नेहमी करीत असलेल्या जादा प्रवासी वाहतुकीवर कारवाई न करण्यासाठी प्रत्येक महिण्याला हफ्ता म्हणून तडजोडीअंती 400 रुपयाची लाचेची मागणी पंच क्र.1 श्री शेळकंदे यांचे समक्ष केल्याचे निष्पन्न झाले.

त्यामुळे आम्ही सापळापुर्व व सापळा कारवाईचे नियोजन करून तक्रारदार भारत बिवाल यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी त्यांचे बचतीमधील रु.200/- (भारतीय चलनातील रु.200/- दराच्या एकुण 2 नोटा) रक्कम हजर केली असता सदर नोटांचे नंबर मपोशि यांनी पंच क्र.2 यांच्या मदतीने एका को-याकागदावर लिहून घेतले. त्यानंतर आमचे सुचनेवरून चालक सहाफौ चव्हाण यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले की, एखादया वस्तुला लागलेली अँथ्रासिन पावडर नेहमीच्या प्रकाशात दिसून येत नाही. सदर वस्तुवर अंधारामध्ये अट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन येते.त्याप्रमाणे सहाफौ चव्हाण यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या रु200/- रुपयाच्या दोन नोटा या लाचेच्या रकमेस अँथ्रासिन पावडर लावली व त्याबाबत प्रात्यक्षिके करून दाखविली.त्यानंतर सदर अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम सहा.फौ चव्हाण यांनी तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली.आम्ही तक्रारदार श्री बिवाल यांना सुचना दिली की, लोकसेकाकडून मागणी झाल्यानंतर सदरची लाच रक्कम उजव्या हाताने काढून त्यांना दयावी.

त्यानंतर आम्ही,तक्रारदार, दोन्ही पंचांना व सापळा पथकास पुढील सापळा कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या. त्यामध्ये लाच रक्कम वॉर्डन गव्हाणे किंवा मपोशि कांबळे यांना दिल्यानंतर तक्रारदाराने परिधान केलेले जॅकेट काढून हातामध्ये घ्यावे असा लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्यास सांगीतले. तसेच पोशि आंडके यांनी त्यांचेकडील शासकीय कॅमेरामध्ये सापळा कारवाईचे संपुर्ण चित्रीकरण करावे अशी सुचना दिली. तसेच लोकसेवक यांना लाच रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांचेसोबत पंच क्र.1 जातील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुशंगाने आमचे सुचनेवरून पोशि रवी दिवेकर यांनी तक्रारदार श्री बिवाल, पंच क्र. 1 श्री शेळकंदे व पंच क्र.2 श्री.काळे यांची सापळा निवेदने व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत केली व



Scanned with CamScanner

पोशि आडके यांनी त्याचे व्हिडीओ शुटींग शासकीय कॅमे-यामधील मेमरीकार्डमध्ये केले ती वेळ 12.31 वाजताची होती. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोशि रवी दिवेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालु करुन तक्रारदार यांचे टिशर्टच्या आत सेफटी पिनच्या साहयाने लावुन दिले ती वेळ दुपारी 12.55 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 शेळकंदे यांना तक्रारदाराच्या ऑटो रिक्षाने सापळा कारवाईकरीता रवाना केले.आम्ही उर्वरित पथक शासकीय वाहनाने पुढे जावून केएसबी चौकाच्या थोडे पुढे अंतरावर कोणासही संशय येणार नाही अशा रितीने विखरुन थांबलो. थोडयाच वेळात तक्रारदार हे त्यांच्या रिक्षातुन उतरुन केएसबी चौकातील फूटपाथ शेजारुन चालू लागले तेव्हा पंच क्रं 1 शेळकंदे हे ही तक्रारदारांच्या पाठोपाठ गेले तेव्हा तक्रारदार श्री म्हसोबा खरावडे प्रसन्न मंदिराच्या शेजारी चहा टपरीशेजारी तसेच पंच क्रं 1 हे चहा टपरीवर थांबले असल्याचे दिसले. आम्ही व सापळा पथक त्यांचे आवती - भोवती संशय येणार नाही असे विखरुन थांबलो. सदरठिकाणी तक्रारदार व एक वॉर्डन चा गणवेश परिधान केलेल्या इसमाचे बोलणे सुरु होते तसेच त्याठिकाणी एक पोलीस गणवेश परिधान केलेली महिला होती.तक्रारदार व वॉर्डन यांचेत चर्चा झाल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या खिशातुन लाचेची रक्कम काढून ती सदर वॉर्डन गणवेश परिधान केलेल्या इसमाचे हातात दिली व त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांनी परिधान केलेले जॅकेट काढून हातात घेवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा केला असता आम्ही व सापळा पथक त्यांचे जवळ जावून पोशि दिवेकर यांनी वॉर्डन गणवेश परिधान केलेल्या इसमाचे दोन्ही हात मनगटाजवळ पकडून त्यास धरून ठेवले व आम्ही पोलीस गणवेश परिधान केलेल्या महिलेच्या हाताच्या मनगटाजवळ पकडले त्यावेळी पोशि दिवेकर यांनी तक्रारदार यांचे व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.05 वाजताची होती.सदर ठिकाणी असलेल्या पंच क्र.1 यांनी हेच वॉर्डन गव्हाणे व मपोशि वर्षा कांबळे असल्याचे आम्हाला सांगितले.त्यावेळी आम्ही दिलेल्या पुर्व सुचनेनुसार पोशि आडके यांनी त्यांचेकडील शासकीय कॅमेरा सुरू करून व्हिडीओ रेकॉडींग सुरू केले.

त्यानंतर आम्ही वॉर्डन गव्हाणे तसेच मपोशि वर्षा कांबळे यांना आमचे शासकीय ओळखपत्र आमची व पथकाची तसेच पंचांची ओळख करून दिली व त्यांचेविरूध्द झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली व वॉर्डन गव्हाने यांना लाचेची रक्क्कम कोठे ठेवली आहे याबाबत विचारणा केली असता वॉर्डन गव्हाणे यांनी त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिशातून लाचेची रक्कम काढून दिली असता आम्ही पंच क्रं 2 यांना लाचेची रक्कम त्यांच्या ताब्यात घेण्यास सांगितली.त्यानंतर सदरठिकाणी लोकांची वर्दळ असल्याने आम्ही वॉर्डन गव्हाणे व मपोशि वर्षा कांबळे यांना शासकिय वाहनात बसवले व शासकिय वाहनात आम्ही वॉर्डन गव्हाणे तसेच लोकसेविका मपोशि वर्षा कांबळे यांना आमची तसेच सापळा पथक व पंच साक्षीदार यांचे हाताची व कपडयाची तपासणी करून दिली असता कोणाचेही हातास अगर कपडयास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली नाही.त्यानंतर आम्ही पंच क्रं 2 यांना सापळापुर्व कारवाई दरम्यान दिलेल्या नोट नंबर लिहलेल्या कागदावरील नोटांचे नंबर व हस्तगत केलेल्या नोटांचे नंबर तपासले असता 200/- रुपये दराच्या 2 नोटांचे नंबर तंतोतंत जुळून आले.त्यानंतर आम्ही शाशकिय वाहनात कृत्रिम अंधार करुन वॉर्डन गव्हाणे यांचेकडून हस्तगत केलेली व पंच क्र.2 यांच्या ताब्यात असलेली लाच रक्कम व वॉर्डन गव्हाणे यांचे हात व कपडयाची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता सदर लाच रकमेवर तसेच वॉर्डन गव्हाणे यांचे उजव्या बोटांचे पे-यास तसेच त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूचे खिशाचे अग्रभागी व खिशाचे आतमध्ये अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर आम्ही वॉर्डन गव्हाणे यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव श्री कृष्णा मच्छिंद्र गव्हाणे वय 28 वर्षे ट्रफिक वॉर्डन रा.वडगाव रोड राम मंदिरासमोर राम अपार्टमेंट,रुम नं 3,दुसरा मजला आळंदी असे सांगीतले.त्यानंतर आम्ही मपोशि वर्षा कांबळे यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव वर्षा विठठल कांबळे वय 35 वर्षे बं क्र 2211 नेमणूक पिंपरी वाहतुक विभाग रा.रुम नं 04,परिवर्तन सोसायटी,बौध्दनगर,पिंपरी ,पुणे असे सांगितले. तेव्हा लोकसेविका मपोशि वर्षा कांबळे यांना बीपीचा व वॉर्डन गव्हाणे यांना पुढील कारवाईसाठी केएसबी चौकात ताब्यात घेतले ती वेळ 13.05 वाजताची होती.उपरोक्तबाबत दोन्ही पंचासमक्ष सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करणेत आलेला आहे.

तरी दि.29/11/2025 रोजी सकाळी 08.56 ते 13.05 वा दरम्यान झालेल्या पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी ट्रफिक वॉर्डन कृष्णा गव्हाणे यांनी मपोशि वर्षा कांबळे यांचे समक्ष केएसबी चौक पिंपरी येथे तक्रारदार यांचेकडे तक्रारदार त्यांच्या अॅटोरिक्षा क्रं MH 12 RP 8847 याने नेहमी करीत असलेल्या जादा प्रवासी वाहतूकीवर कारवाई न करण्याकरीता प्रत्येक महिण्याला हफ़्ता म्हणून स्वत करीता व मपोशि वर्षा कांबळे यांचे करीता पंचासमक्ष 500 रुपयाची लाचेची मागणी करुन तडतोडी अंती 400 रुपये केएसबी चौक पिंपरी पुणे फूटपाथवरील म्हसोबा खरवडे प्रसन्न मंदिराच्या शेजारील चहाच्या टपरीजवळ पंचासमक्ष स्वीकारली म्हणून माझी वर्षा विठठल कांबळे वय 35 वर्षे बं क्र 2211 नेमणूक पिंपरी वाहतुक विभाग रा.रुम नं 04,परिवर्तन सोसायटी,बौध्दनगर,पिंपरी ,पुणे तसेच श्री कृष्णा मच्छिंद्र गव्हाणे वय 28 वर्षे ट्रफिक वॉर्डन रा.वडगाव रोड राम



Scanned with CamScanner

मंदिरासमोर राम अपार्टमेंट,रुम नं 3,दुसरा मजला आळंदी यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7,7(अ),12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

Vanita Shrikant Dhumal(I (Inspector)) / PI

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / Informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Ashedge 30/11/25

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
... पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vanita Shrikant Dhu
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI



Scanned with CamScanner